महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

# आरोग्य विभागांतर्गत गट-क व गट ड संवर्गाचे अंतिम सुधारीत निकाल घोषित करणेबाबत.

आरोग्य विभागातील गट क व गट ड मधील रिक्त पदे भरण्याकरीता ०८ जानेवारी २०१७ व २२ जानेवारी २०१७ रोजी झालेल्या लेखी परीक्षेचा निकाल व उत्तरतालिका दिनांक २८ एप्रिल २०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आल्या होत्या.

तथापी काही परीक्षार्थी उमेदवारांनी त्यांना लेखी परीक्षेत कमी गुण प्राप्त झाल्याबाबतची निवेदने सादर केली होती. तसेच काही परीक्षार्थी उमेदवारांनी त्यांनी पुर्वी घेतलेल्या आक्षेपांचा विचार न करता उत्तरतालिका प्रसिध्द केले असल्याबाबतचा आक्षेप घेतले होते.

या सर्व बाबींचा विचार करुन आरोग्य विभागाने नव्याने प्राप्त झालेले आक्षेप पुनश्चः तज्ञ समितीसमोर सादर केले. तज्ञ समितीने आक्षेपीत प्रश्न-उत्तरांबाबत फेरविचार करुन त्यांचे अंतिम अभिप्राय सादर केले. त्यानूसार सर्व उत्तरपत्रिकांची पुन:तपासणी करण्यात आली असून अंतिम सर्वसाधारण सुधारीत गुणवत्ता यादी तयार करण्यात आली आहे. सदर अंतिम सर्वसाधारण गुणवत्ता यादी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या http://arogya.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे. गुणवत्ता यादीनूसार निवड झालेल्या उमेदवारांची सामाजिक व समांतर आरक्षण निहाय यादी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या http://arogya.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे. वाहनचालक या पदाची गुणवत्ता यादी व निवड यादी लवकरच प्रसिध्द करण्यात येईल.

गुणवत्ता यादीत ज्या उमेदवारांना समान गुण प्राप्त झाले आहेत अशा उमेदवारांचे बाबतीत सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक:प्रनिमं-१२१५/(प्र.क्र.५५/१५)/१३-अ, दिनांक ०५ ऑक्टोबर, २०१५ नूसार कार्यवाही करण्यात आली आहे.

यापुर्वी प्राप्त झालेल्या आक्षेचांची पुर्तता करण्यात आलेली आहे. त्यानूसार तयार करण्यात आलेली सुधारीत गुणवत्ता यादी व निवड यादी ही अंतिम असून या यादीबाबत आतां कोणतेही आक्षेप किंवा सुचना स्विकारल्या जाणार नाहीत व त्याबाबतचा कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : मुंबई

दिनांक : १५०७|२०१७

संचालक,

आरोग्य सेवा, मुंबई.